अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. ९ ऑगस्ट २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : ३११ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## भारतीय हॉकी संघाची कांस्यपदकाला गवसणी

✔ **पॅरिस** : भारताने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकताना स्पेनवर २-१ असा दमदार विजय साकारला. भारताचे हे सलग दुसरे कांस्यपदक ठरले. टोकियो ऑलिम्पिकमध्येही भारताने कांस्यपदक जिंकले होते. भारताने हॉकीच्या कांस्यपदकाच्या लढतीत स्पेनला कडवी झुंज दिली. स्पेनने सामन्याच्या १८ व्या मिनिटाला गोल केला होता. त्यामुळे त्यांनी १-० अशी आघाडी घेतली होती. पण भारतानेही हार मानली नाही. दुसरे सत्र संपायला फक्त ४८ सेकंद शिल्लक असताना भारताने पेनेल्टी कॉर्नरवर गोल केला आणि सामन्यात १-१ अशी बरोबरी केली. भारताने त्यानंतर पेनेल्टी कॉर्नरवर ३३ व्या मिनिटाला पुन्हा एकदा गोल केला आणि भारताने २-१ अशी आघाडी घेतली. ही आघाडी भारताने तिसऱ्या सत्रातही कायम ठेवली. चौथ्या सत्रातही भारताने दमदार कामगिरी केली.



# आमदार बच्चू कडूंची सटकली अधिकाऱ्याच्या श्रीमुखात भडकावली

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**अमरावती जिल्ह्यातील अचलपूर विधानसभा मतदार संघाचे आमदार बच्चू कडू यांची सामाजिक बांधिलकी राज्यात सर्वश्रुत असली तरी त्यांच्या ठोकशाहीने ते स्वतःच बदनामी ओढवून घेत आहेत. त्यांच्या ठोकशाहीचे प्रकार नवीन नाहीत.अगदी लोकप्रतिनिधी झाल्यापासून त्यांची ठोकशाही पहायला मिळते.समोर कोण आहे,याची त्यांना फिकिर नसते. कानावर एखादी तक्रार पडली की,समोरचा चुकला समजून ते आपला हात चालवत असतात.असाचा एक प्रकार गुरूवारी छ.संभाजीनगरमधील विश्रामगृहात घडला.ई रिक्षा प्रकरणी एका दिव्यांग बांधवाने तक्रार करताच कडूंची सटकली आणि समोर आलेल्या अधिकाऱ्याच्या कानाखालीच लगावली.कडूंच्या या प्रतापाने अधिकारी वर्गात संतापाची लाट उसळली आहे.**



झाले असे की, कडू हे गुरूवारी छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर होते. तेथील काही दिव्यांग व्यक्तींना ई-रिक्षाचे वाटप करण्यात आले होते. या रिक्षाच्या माध्यमातून त्यांचा उदरनिर्वाह व्हावा, हा शासनाचा हेतू आहे. मात्र ज्या दिवशी वाटप करण्यात आले, त्याच दिवशी रिक्षा बंद पडल्या. या बंद पडलेल्या काही रिक्षांना इतर वाहनांच्या मदतीने घरी घेऊन जावे लागले. परिणामी दिव्यांग व्यक्तींना नाहक त्रासाला सामोरे जावे लागले.

शासकीय विश्रामगृहासमोर कडू आणि त्यांचे कार्यकर्ते थांबले होते.समोर काही अधिकारीही थांबून होते.

एका दिव्यांग व्यक्तीने तक्रार केल्यानंतर कोण आहेत अधिकारी,अशी विचारणा कडून यांनी केली.तेव्हा समाज कल्याण विभागातील वरिष्ठ अधिकारी देखील समोर आले. तेव्हा कशाचाही आचार विचार न करता कडूंनी त्यांना गालावर चापट मारली.हा प्रकार घडताच समोर थांबलेले अधिकारी भांबावून गेले.सगळ्या देखत चापट मारल्याने त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा चेहरा अपराधी झाला.

अपंगांना दिलेल्या रिक्षा बंद पडत असल्यावरून कडूंनी अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. त्यावेळी कडू यांनी अधिकारी आणि रिक्षा कंपनीच्या मालकाला मारल्याचा प्रकार घडला. आता या प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

कडू हे विश्रामगृहात आल्यानंतर त्याचवेळी संबंधित आधिकारी आणि रिक्षा कंपनीचे मालकही विश्रामगृहात पोहचले होते. दिव्यांग व्यक्तीने झालेला प्रकार कडूंना सांगितला.

बंद पडलेल्या रिक्षांमुळे मनस्तापाला समोरे जावे लागल्याचे सांगितले. ही तक्रार करताच कडू हे संतप्त झाले होते. त्यातूनच त्यांनी संबंधित अधिकाऱ्याला चापट मारली.

कडूंनी अधिकाऱ्याला झापडल्यानंतर दिव्यांग व्यक्तीने नेमके काय घडले याची माहिती दिली. मिळालेली रिक्षा वारंवार पटली होते.

यामुळे प्रवाशांना स्वतःच्या खिशातूनच पैसे देण्याची वेळ आली. चढावर या रिक्षा चढत नाहीत. या रिक्षा चार्जींगमध्ये किती किलोमीटर जातात याची माहिती नाही. रिक्षाच्या बॅटरीची क्षमता किती, हे समजत नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याची व्यथा दिव्यांगांनी कडूंसमोर मांडली.

### जुना प्रसंग काय सांगतो...

कडू यांनी २९ मार्च २०१६ रोजी मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव भा. र. गावित यांना मारहाण केली होती. त्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र पडसाद उमटले. मंत्रालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी खाली उतरले व त्यांनी ठिय्या आंदोलन केले. मात्र, त्यानंतरही कडू यांच्यावर कारवाई होत नसल्यामुळे दुसऱ्या दिवशीही कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन केले.त्यानंतर कडू यांना अखेर मुंबईच्या मरीन ड्राइव्ह पोलिसांनी अटक केली होती.

### मांजराच्या गळ्यात घंटा कुणी बांधायची?

खासदार वा आमदारांनी अधिकाऱ्यांना मारहाण करावी,अशी घटनेत तरतूदच नाही.तरीही काही लोकप्रतिनिधी मारहाण करून कायदा हातात घेण्याचा उद्योग करत आहेत. अधिकारी हे शासनाचे म्हणजेच जनतेचे नोकर आहेत. आमदारांचे नाहीत. खासदार-आमदारांनी त्यांच्याकडून काम करून घ्यायचे असते.सांगूनही अधिकारी ऐकत नसतील तर आमदारांना मुख्यमंत्र्यांपर्यंत तक्रार करता येते.एवढेच कशाला हाऊसमध्ये जाब विचारता येतो पण मारहाण करणे कायद्याने गुन्हा आहे.अशा प्रकारांचा व्हीडिओ लागलीच समोर येत असतो.कडू यांनी मारहाण केल्याचे स्पष्ट दिसत असताना त्यांच्यावर कसलीच कारवाई होत नाही,ही घटनेची शोकांतिका आहे,असा संताप विधी क्षेत्रातून व्यक्त होतो आहे.आमदारांकडे काम करायचे म्हटल्यास मांजराच्या गळ्यात घंटा कुणी बांधायची अशी वाईट अवस्था सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची झाली आहे.

## बस स्थानकात सव्वा लाखाची चैन पळवली

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

बसमध्ये प्रवेश करताना चोरट्याने मुंबईच्या एका प्रवाशाच्या गळ्यातील १ लाख २० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन शिताफीने पळवली. ही चोरी १७ जुलै रोजी सकाळच्या सुमारास पंढरपूरातील चंद्रभागा एसटी स्टँड येथे घडली. या संदर्भात अरविंद पांडुरंगा चव्हाण (रा. भांडुप, जि. मुंबई) यांनी नुकतीच पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात दाखल केली. ते १७ जुलै रोजी आपल्या पत्नीसह पंढरपूर येथील बस स्थानकातून पंढरपूर ते कराड या क्रमांकाची बस पकडली होती. यावेळी गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांच्या गळ्यातील २७ ग्रॅम सोन्याची चैन पडली होती. त्यानंतर चव्हाण यांनी नुकतीच पोलिसात फिर्याद दाखल केली. हवालदार ढेरे पुढील तपास करीत आहेत.

### विद्यालयाच्या प्रयोगशाळेची इमारत पाडल्या प्रकरणी

## चोपडीच्या सरपंचासह अन्य सदस्यांवर सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

✔ सांगोला/प्रतिनिधी

तालुक्यातील चोपडी ग्रामपंचायतीच्या मालकीच्या खोलीत १९७२ पासून असलेली बाळासाहेब देसाई विद्यालयाची प्रयोगशाळा खोली २९ जुलै रोजी ग्रामपंचायतीने जीसीपीच्या साह्याने पाडून आठ लाख रुपयाचे नुकसान केले म्हणून ८ ऑगस्ट रोजी सरपंच व सदस्यावर संस्थेच्या सचिवाने सांगोला पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केल्याने खळबळ उडाली आहे

याबाबत माहिती अशी की तालुक्यातील चोपडी ग्रामपंचायतच्या मालकीची खोली होती ती खोली १९७२ पासून बाळासाहेब देसाई विद्यालयाच्या ताब्यात असून तेथे शाळेची प्रयोगशाळा असल्याचे सध्याचे सचिव सुनील आनंदराव बाबर यांनी दावा केला आहे

२९ जुलै २०२४ रोजी ग्रामपंचायतची बैठक झाली व त्या बैठकीत ग्रामपंचायतची असलेली जागा ताब्यात घेऊन पाडण्याचा ठराव झालेला आहे तरी शाळेकडे काही कागदपत्र असेल तर ते घेऊन ग्रामपंचायत कार्यालयात यावे असे ग्रामसेवकांनी निरोप पाठविला त्यानुसार मुख्याध्यापकाने व सचिवाने शिपाई मार्फत कागदपत्र पाठविले त्यानंतर दुपारी दोन वाजता संस्थेचे सचिव सुनील बाबर हे प्रयोगशाळे जवळ गेले असता तेथे सरपंच मंगल सरगर उपसरपंच पोपट यादव सदस्य दिनकर बाबर व बाळासाहेब बाबर हे होते त्यांनी जेसीपी दोन ट्रॅक्टर व एक टमटम या वाहनाच्या साह्याने प्रयोगशाळा पाडून त्यातील साहित्याची नासधूस करून शाळेचे सात ते आठ लाख रुपयांचे नुकसान केले म्हणून सरपंच सरगर उपसरपंच यादव सदस्य दिनकर बाबर व बाळासाहेब बाबर यांच्यावर सांगोला पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहेत.



## चूल पेटवताना आगीच्या भडक्यात विवाहितेचा भाजून मृत्यू

✔ सोलापूर/प्रतिनिधी

चूल पेटवताना आगीच्या भडक्यात ४५ वर्षीय विवाहीता भाजून मयत झाली. त्यांना वाचविताना २४ वर्षीय मुलगा हा देखिल किरकोळ भाजून जखमी झाला.ही घटना केगावतांडा (ता. उत्तर सोलापूर) येथील शिवाजीनगरात गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली.

रुक्मिणी हरिदास राठोड (वय ४५ रा. शिवाजीनगर केगाव तांडा, उत्तर सोलापूर) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या आज गुरुवारी सकाळी ६ वाजेच्या सुमारास घरासमोर चूल पेटवत होत्या. चुलीत तेल ओतताना अचानक आगीचा भडका उडून अंगावरील कपडे पेटल्याने त्या गंभीर भाजल्या. त्यांना वाचविताना विकास हरिदास राठोड (वय २४) हा देखील भाजून किरकोळ जखमी झाला होता. दोघांनाही उपचारासाठी शासकिय रुग्णालयात हरिदास राठोड यांनी दाखल केले होते. त्यापैकी रुक्मिणी राठोड या उपचारादरम्यान दुपारी २ वाजेच्या सुमारास मयत झाल्या. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे .

### केगावतांडा येथील घटना

## राज्यातील बाजारपेठा २७ ऑगस्ट रोजी बंद

✔ पुणे/प्रतिनिधी




अन्नधान्यावर वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू करण्यात आल्याने बाजार समितीकडून आकारण्यात येणारा नियमन कर (सेस) रद्द करण्यात यावा. जीएसटी कायदा सुटसुटीत करण्यात यावा, यासह विविध मागण्यांसाठी राज्यभरातील व्यापाऱ्यांकडून २७ ऑगस्ट रोजी बाजारपेठा बंद ठेवण्यात येणार आहेत, अशी माहिती सांगली चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अमरसिंह देसाई यांनी दिली. अन्नधान्यावर वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू करण्यात आल्याने बाजार समितीकडून आकारण्यात येणारा नियमन कर (सेस) रद्द करण्यात यावा. जीएसटी कायदा सुटसुटीत करण्यात यावा, लिगल मॅट्रोलॉजी कायदा नियम तीनमध्ये बदल करू नये, यासह विविध मागण्यांचे ठराव परिषदेत संमत करण्यात आले. बाजार आवारातील कर रद्द करण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून पाठपुरावा करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

### १६ ऑगस्टला सांगलीत परिषद

सातारा, सांगली, पुणे, कोल्हापूर, सोलापूर या पाच जिल्ह्यातील विभागीय परिषद दि. १६ ऑगस्ट रोजी सकाळी १०:०० वाजता सांगलीतील मार्केट यार्डात घेण्यात येणार आहे. या परिषदेमध्ये आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार आहे, अशी माहिती अमरसिंह देसाई यांनी दिली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




जा माझा निरोप द्या!

कल्याण
220-49-270

मुंबई
247-35-113

## एकच वादा! अजितदादा...

## “बहिणींनो, घाबरु नका,ओवाळणी मिळेपर्यंत तुमच्या पाठीशी”

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**राज्यातील लाडक्या बहिणींना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी मोठा धीर दिला. घाबरु नका!!! तुम्हाला योजनेचे पैसे मिळत नाहीत, तोपर्यंत हा अजितदादा तुमच्या पाठीशी उभा आहे, असा शब्दही त्यांनी लाडक्या बहिणींना दिला.**




अजितदादा यांच्या पक्षाच्या वतीने जनसन्मान यात्रेचे आयोजन केले आहे. त्याचा शुभारंभ गुरूवारी नाशिक येथे झाला.त्याप्रसंगी बोलताना अजितदादांनी महायुतीच्या सरकारने लोकांसाठी राबवलेल्या योजनांवर प्रकाश टाकला

### गुलाबी रंगाचे रहस्य

जनसन्मान यात्रेला गुरूवारी नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथून सुरुवात झाली. यात्रेतील गुलाबी रंगाची वाहने वेधून घेतले. या गुलाबी वाहनांच्या माध्यमातून लाडकी बहीण योजना आपल्यामळेच कशी येऊ शकली, हे ठसविण्याचा प्रयत्न अजितदादांनी केल्याची चर्चा आहे. यात्रेतील ताफ्यात गुलाबी रंगाची वाहने सर्वांचे लक्ष वेधून घेतली. महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा गुलाबी रंग वाहनांसाठी वापरण्यात आला आहे. यात्रेत सहभागी झालेले मंत्री, पदाधिकारी यांच्यासाठी दोन-तीन व्हॅनिटी वाहने गुलाबी रंगाची होती. या माध्यमातून लाडकी बहीण योजनेसह इतर शासकीय योजनांची प्रसिध्दी करण्यात आली. अजित पवार यांनी आपल्या पोषाखात केलेला बदल याआधीच चर्चेत आला असून जनसन्मान यात्रेतही त्यांनी गुलाबी रंगाचे जॅकेट परिधान केले होते.

### अजितदादांचा वादा

''१७ ऑगस्टपर्यंत बहिणींच्या खात्यात ही रक्कम जमा होणार आहे. बुधवारच्या कॅबिनेट बैठकीनंतर ६ हजार कोटी रुपयांच्या फाईलवर सही करुन नाशिकला आलो आहे. हा चुनावी जुमला नाही. तुम्ही साथ द्या ही योजना कायमस्वरूपी सुरू ठेवण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे हा अजितदादाचा वादा आहे. हे राज्यसरकार कुणासाठी आहे तर तुमच्यासाठी आहे... तुमच्यासाठी खर्च करायचा नाही तर कुणासाठी खर्च करायचा... सर्व मुलींना मोफत शिक्षण देणार आहे. वर्षाला तीन सिलेंडर मोफत दिले जाणार आहेत,अशा शब्दात त्यांनी या योजनेचा वेध घेतला.

### वायरमनला माझे नाव सांगा

शेतकऱ्यांचे शेतीचे वीज बील माफ केले आहे. मागचे पण आणि पुढचेही वीज बिल भरायचे नाहीय. वायरमन विचारायला आला तर त्याला माझे नाव सांगा,असे ते म्हणतात उपस्थितांमधून हास्याचे फवारे उडाले. काळजी करु नका हे सरकार तुमच्या पाठीशी आहे,'' असा शब्दही त्यांनी राज्यातील जनतेला दिला.

ते म्हणाले की, अजूनही महिलांचे सबलीकरण करण्याची गरज आहे. राज्याच्या महिला धोरणातून महिलांना मान - सन्मान देण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थसंकल्पात लाडक्या बहिणींना १५०० रुपये देण्याचा निर्णय घेतला. अजूनही अर्ज भरले जात आहेत.

माझ्यासारख्या एका जनसेवकासाठी जनता हाच देव आहे. तुम्ही दिलेली शक्ती हीच माझी दैवीशक्ती आहे. तीन दशकांपासून ठामपणे तुम्ही माझ्या पाठीशी ती उभी केली आहे. ३३ वर्षाच्या राजकीय कारकीर्दीत मी अनेक उन्हाळे-पावसाळे बघितले आहेत. शेतकऱ्यांना मदत केली आहे.

माझ्या शेतकऱ्यांना सावकारांच्या दारात जायला लागत होते. शेतकऱ्यांना सावकाराच्या दारात जायला लागू नये म्हणून कमी व्याजात कर्ज देण्याचा निर्णय घेतला आणि शून्य टक्के व्याजाने कर्ज द्यायला सुरुवात केली. त्यामुळे आजही शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळत आहे,असा दावाही त्यांनी केला

छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातींना सोबत घेऊन जसे स्वराज्य उभे केले, त्या सर्व घटकांचा आवाज ऐकून त्यांचे दुःख, त्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्याप्रमाणे काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही करत आहोत. महिला, युवा - युवती, शेतकरी यांच्यासाठी अनेक चांगल्या योजना महायुतीच्या माध्यमातून आणल्या आहेत. आम्ही जनसेवक आहोत, जनतेची सेवा करणे हा आमचा धर्म आहे,असेही त्यांनी ठासून सांगितले.